महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
E mail ID: ropune@dtemaharashtra.gov.in
४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

जा.क्र. तंशिविकापु/आस्था १/२०२०/ 4556 दिनांक 24-12-2020 24 DEC 2020

प्रति,

संचालक/प्राचार्य/उपसचिव,
सर्व शासकीय /अशासकीय अनुदानित पदविका संस्था,
पुणे विभाग, पुणे.

विषय :-राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका संस्थांमधील अधिव्याख्यातांना रू.१५६००-३९१०० या वेतन संरचनेत ग्रेड पे रुपये. ५०००/- ऐवजी ग्रेड पे रुपये.५४००/- लागू करण्याबाबत.

संदर्भ : - ०१.संचालनालयाचे पत्र क्र.५(३)/आस्था/७वेआ/२०२०/२७५ दि.२४/१२/२०२०
०२.या कार्यालयाचे पत्र क्र.तिंशिविकापु/आस्था१/२०२०/४५३५ दिनांक २४/१२/२०२०

उपरोक्त विषयाबाबत या कार्यालयाने संदर्भिय क्रमांक ०२ चे पत्र निर्गमित केलेले आहे. तदनंतर संचालनालयाकडून पत्र प्राप्त झालेले आहे. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे कळविण्यात येते आहे.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासन निर्णय दिनांक २०/०८/२०१० अन्वये तंत्रशिक्षण विभागातील शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील अधिव्याख्यातांना सहाव्या वेतन आयोगानुसार दिनांक ०१ जानेवारी २००६ पासुन रू.१५६००-३९१०० या वेतन संरचनेत ग्रेड वेतन रू.५००० लागू करण्यात आलेला आहे.

तदनंतर शासन निर्णय दिनांक १६ डिसेंबर २०२० अन्वये तंत्रशिक्षण विभागातील शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील अधिव्याख्यातांना सहाव्या वेतन आयोगानुसार दिनांक ०१ जानेवारी २००६ पासुन रू.१५६००-३९१०० या वेतन संरचनेत ग्रेड वेतन रू ५४०० लागू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार संचालनालयाच्या संदर्भिय पत्र क्रमांक ०१ अन्वये प्राप्त निर्देशानुसार सर्व संस्था प्रमुखांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील अधिव्याख्यातांना रु .५४००/- ग्रेड वेतन लागू करण्याबाबत व सदर ग्रेड वेतन लागू केल्यानंतर दि ०१ जानेवारी २००६ ते ३१ डिसेंबर २०१५ या कालावधीतील थकबाकी देण्यासंदर्भात दिनांक २०/०८/२०१० रोजीच्या शासन निर्णयातील संबंधीत मुद्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

संचालनालयाने संदर्भिय पत्रान्वये दिनांक १६ डिसेंबर २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने दि.०१ जानेवारी २००६ पासुन मंजूर करण्यात आलेला ग्रेड वेतन रू.५४००/- च्या वेतन निश्चितीस मान्यता देण्याकरीता सहसंचालक यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

तसेच ग्रेड वेतन रू.५४००/- च्या अनुषंगाने सातव्या वेतन आयोगाच्या शासन निर्णयानुसार वेतन निश्चितीची सुध्दा कार्यवाही संस्था स्तरावर करण्यात यावी.

दोन्ही वेतन निश्चितीची कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही या विभागीय कार्यालयाकडून करण्यात येईल.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे.

प्रत- मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर. (कार्यासन क्रमांक ०५)